# जपानी पुष्परचना - भाग २३




पिवळा रंग मैत्रीचा आणि गुलाबी रंग प्रेमाचा! प्रेम आणि मैत्री दोन्ही जोडीने येणाऱ्या भावना. म्हणून हे दोन रंग निवडले यावेळी. दोन्ही रंग एकमेकांना पूरक आहेत. त्यासोबत पांढऱ्या आणि जांभळ्या रंगाची फिलर फुले वापरली आहेत. हिरवी झेनाडूची व अस्परागसची पाने वापरली आहेत.
एक नाजूक वेलीची वाळलेली वळणदार काडी दोन्ही व्हाज मधील नाते दाखवत आहे. आणखी एक जपानी रचनेमधील खासियत अशी की कोणत्याही फुलांची उंची सारखी नाही. प्रत्येक फूल वेगवेगळ्या उंचीवर लावले आहे. प्रत्येक फूल आणि मोठी पाने याचे अँगल्स पण वेगळे आहेत. फोटो काढताना काळी बॅकग्राउंड असल्यामुळे रचनेतील सर्व रंग खुलून दिसत आहेत.

या वर्षातील डिसेंबर शेवटचा महिना. त्यामुळे सगळ्यांना नवीन वर्षाच्या खूप खूप मनापासून शुभेच्छा!

पुन्हा पुढच्या वर्षी दर महिन्याला भेटत राहू, नवीन कल्पना आणि नवीन रचनानांसह!!
तुमच्या काही सूचना किंवा अभिप्राय असतील तर जरूर पाठवा.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबा पुणे शाखा
email - asdssd@gmail.com
फोन नंबर - 9881043456